# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 15.04.2011 रोजी (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

शुक्रवार दिनांक 15 एप्रिल 2011 रोजी (दि.13/04/11 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 3.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त,श्री.अजय चारठाणकर,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**विषय क्र. 220 :**

दिनांक 20/01/2011 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.सभापती : विषय क्रमांक 220 ते 225 मंजूर.

**ठराव :**

दिनांक 20/01/2011 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. 221 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, पावरलुम एम.आय.डी.सी. चिकलठाणा वार्ड क्र.24 येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार अ.प. र.रू.19,99,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होवून मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे. तरी अ.प. र.रू.19,99,900/- चे अ.प. प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पावरलुम एम.आय.डी.सी. चिकलठाणा वार्ड क्र.24 येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.19,99,900/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 222 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.24, सिडको एन-1 येथे डांबरी रस्त्यालगत उर्वरित भाग पदपाथ करिता पेव्हर ब्लॉक बसविणे सा.बां. विभागाच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून अ.प. र.रू.19,99,400/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च सन 2010-2011 या आर्थिक वर्षात करण्यात येईल. अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली असून मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तरी अ.प. र.रू.19,99,400/- चे मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.24, सिडको एन-1 येथे डांबरी रस्त्यालगत उर्वरित भाग पदपाथ करिता पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.19,99,400/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 223 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.24, नारेगांव येथे उर्वरित रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे सा.बां. विभागाच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून अ.प. र.रू.19,01,600/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च सन 2010-2011 या आर्थिक वर्षात करण्यात येईल. अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली असून, मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तरी अ.प. र.रू.19,01,600/- चे मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.24, नारेगांव येथे उर्वरित रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.19,01,600/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 224 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.78 येथील मनपा शाळेवर पहिला मजला बांधणे तसेच संरक्षक भिंतीची दुरूस्ती व उंची वाढविणे या कामाचे अ.प. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-11 दरसुचीनुसार र.रू.14,76,902/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-2011 या आर्थिक वर्षात मनपा सर्व शाळा, दवाखाने व इतर इमारतीची दुरूस्ती या लेखाशिर्षकामधुन करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

तरी अंदाजपत्रक र.रू.14,76,902/- च्या अ.प. चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव व विचारास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.78 येथील मनपा शाळेवर पहिला मजला बांधणे तसेच संरक्षक भिंतीची दुरूस्ती व उंची वाढविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.14,76,902/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 225 :**

श्री.शिरीष रामटेके, उप अभियंता, नगर रचना विभाग (तत्कालीन मालमत्ता अधिकारी), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2007/718 दि.17.5.2007, जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/2007/497 दि.28.3.2008 विरूध्द स्थायी समितीकडे मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 56 (4) अन्वये दिनांक 16.6.2007, 31.3.2008 व 28.3.2011 रोजी सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : बऱ्याच अधिकाऱ्यांवर कारवाई होत आहे. एखादा गैरव्यवहार झाला की, कुणाला टार्गेट करायच म्हणून कुणाचा तरी बळी दिला जातो. अर्थात एका माणसाची ही चुक नसते. कुठलाही गैरव्यवहार महापालिकेत होऊ नये. यासाठी प्रशासनाने काळजी घ्यावी. भविष्यात एकाला दोषी न धरता पुर्ण जी सिस्टीममध्ये, संचिकेमध्ये सही केली जाते त्या सगळयांना दोषी धरण्यात यावे.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.शिरीष रामटेके उपअभियंता यांचे अपील मंजुर करण्यात येते. कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/718 दिनांक 17/05/2007 मध्ये श्री.शिरीष रामटेके यांचेविरूध्द लावण्यात आलेल्या शास्ती अनुक्रमांक 1 ते 6 रद्द करण्यांत येतात. तसेच आदेश जा.क्र. मनपा/मआ/आस्था-1/497 दिनांक 28/03/2008 अन्वये श्री.शिरीष रामटेके उपअभियंता यांना भरणा करण्यास्तव आदेशीत केलेली रक्कम ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 11 मधील कलम 128 मध्ये दर्शविण्यात आलेल्या तरतुदीनुसार संबंधीत ठेकेदाराकडे असलेली थकीत रक्कम ही संबंधीत विभागामार्फत प्रचलित पध्दतीने वसुल करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.शिरीष रामटेके उपअभियंता यांचे अपील मंजुर करण्यात येते. कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मआ/आस्था-1/718 दिनांक 17/05/2007 मध्ये श्री.शिरीष रामटेके यांचेविरूध्द लावण्यात आलेल्या शास्ती अनुक्रमांक 1 ते 6 रद्द करण्यांत येतात. तसेच आदेश जा.क्र. मनपा/मआ/आस्था-1/497 दिनांक 28/03/2008 अन्वये श्री.शिरीष रामटेके उपअभियंता यांना भरणा करण्यास्तव आदेशीत केलेली रक्कम ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 11 मधील कलम 128 मध्ये दर्शविण्यात आलेल्या तरतुदीनुसार संबंधीत ठेकेदाराकडे असलेली थकीत रक्कम ही संबंधीत विभागामार्फत प्रचलित पध्दतीने वसुल करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी. यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 226 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.79 मनपा शाळेची पुर्व (बाजुकडील) कंपाऊंड वॉलची पुनर्बांधणी करणे, उंची वाढविणे, स्वच्छता गृहाची दुरूस्ती व इतर कामे करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार र.रू.9,40,549/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च मनपा शाळा दवाखाने व इतर इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली

असता एकूण (एक) निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

मे.ड्रिमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन 38% जास्त दराने.

वरीलप्रमाणे प्राप्त निविदा उघडली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38% जास्त दराची मे.ड्रिमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे. प्रस्तावित अंदाजपत्रक सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दर सुचीनुसार तयार करण्यात आले आहे. संबंधीत गुत्तेदाराने सन 2010-11 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचिनुसार दरवाढीचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. त्यानुसार सन 2008-09 च्या दरसुचीमध्ये सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात 29.91% एवढी वाढ झालेली आहे. सदर दर जास्त वाटत असल्यामूळे कंत्राटदारासोबत दराच्या वाटाघाटीअंती 20% जास्त दराची निविदेस मंजुरी प्राप्त आहे. अं.प. दरापेक्षा 20% जास्त दराने निविदा मंजुर केल्यास, या कामावर 11,28,865/- एवढा खर्च अपेक्षित आहे. वाढीव खर्च मंजुरीस्तव व अं.प. दरापेक्षा 20% जास्त दरास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी अं. प. दरापेक्षा 20% जास्त दराने मे.ड्रिमलॅन्ड कंस्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य : विषय क्रमांक 226 व 227 मध्ये एकच निवीदा प्राप्त झालेली आहे. दोन्ही ठिकाणी कंत्राटदाराने जास्त दर भरलेले आहे. Negotiation च्या वेळेस एका विषयास 20 टक्के जास्त दराने आणि दुसऱ्या विषयास 21 टक्के जास्त दराने देण्याचे प्रस्तावित झालेले आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक 226 आणि 227 मध्ये कामाचे ठिकाण वेगवेगळे असले तरी एकच कंत्राटदार आहे. कामाचे स्वरूपही एकच आहे. एका विषयास 21 टक्के जास्त दराने व दुसऱ्या विषयास 20 टक्के जास्त दराने हे योग्य नाही. दोन्ही विषयास 20 टक्के जास्त दराने मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.79 मनपा शाळेची पुर्व (बाजुकडील) कंपाऊंड वॉलची पुनर्बांधणी करणे, उंची वाढविणे, स्वच्छता गृहाची दुरूस्ती व इतर कामे करणेच्या कामासाठी प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.ड्रिमलॅन्ड कंस्ट्रक्शन यांची 20% जास्त दराची निविदा स्विकारणेस र.रू.11,28,865/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 227 :</u>**

कार्यकारी अभियंता वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.79 संघर्षनगर सिडको येथील खुल्या जागेत सभागृह बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार र.रू.11,30,709/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च व्यापारी संकुले इतर इमारती या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण (एक) निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

मे.ड्रिमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन 28% जास्त दराने.

वरीलप्रमाणे प्राप्त निविदा उघडली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28% जास्त दराची मे.ड्रिमलॅन्ड कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे. प्रस्तावित अंदाजपत्रक सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. संबंधीत गुत्तेदाराने सन 2010-11 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचिनुसार दरवाढीचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. त्यानुसार सन 2008-09 च्या दरसुचीमध्ये सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात 25.43% एवढी वाढ झालेली आहे. सदर दर जास्त वाटत असल्यामूळे कंत्राटदारासोबत दराच्या वाटाघाटीअंती 21% जास्त दराची निविदेस मंजुरी प्राप्त आहे. अं.प. दरापेक्षा 21% जास्त दराने निविदा मंजुर केल्यास, या कामावर 13,68,157/- एवढा खर्च अपेक्षित आहे. वाढीव खर्च मंजुरीस्तव व अं.प. दरापेक्षा 21% जास्त दरास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी अं. प. दरापेक्षा 21% जास्त दराने मे.ड्रिमलॅन्ड कंस्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्र.79 संघर्षनगर सिडको येथील खुल्या जागेत सभागृह बांधणेच्या कामासाठी प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.ड्रिमलॅन्ड कंस्ट्रक्शन यांची 21% जास्त दरा ऐवजी सदर काम त्यांचेकडून 20% जास्त दराने करून घेणेस व याकामासाठी येणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 228 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.70, विद्यानगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसुचीनुसार र.रू.9,99,915/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च शहरी भागात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण (दोन) निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | |
|---|---|
| 1. श्री.एम.ए.सिद्दीकी | 42% जास्त दराने. |
| 2. मे.आर.के. कंन्स्ट्रक्शन | *Technically Rejected* |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजेच सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 42% जास्त दराची श्री.एम.ए.सिद्दीकी यांची निविदा प्राप्त आहे. प्रस्तावित अंदाजपत्रक सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सन 2008-09 च्या दरसुचीमध्ये सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात 22.56%एवढी वाढ झालेली आहे. कंत्राटदारासोबत दराच्या वाटाघाटीअंती कंत्राटदार यांनी 21% जास्तदराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे.या दराने कामावर रू.11,63,360/- एवढा खर्च अपेक्षित आहे. 21% जास्त दरास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. सन 2010-11 ची दरसुची बरोबर तुलना करता सदर दर हा अं.प. दरापेक्षा 1.56% कमी दराने येतो.

तरी अं. प. दरापेक्षा 21% जास्त दराने श्री.एम.ए.सिद्दीकी यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : डांबरीकरणाचे काम असल्यामुळे सदरील विषयास 21 टक्के जास्त दराने प्रचलित केलेले आहे. 20 टक्के दरानेच मंजूरी देण्यात येते. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :मागील बैठकींमध्ये विषयांना मंजुरी दिलेली आहे. वर्क ऑर्डर होऊन चार ते पाच महिने झालेले आहे. परंतु अद्याप पर्यंत कुणाच्या वार्डात काम चालु झालेले नाही. डांबरीकरणाचे कामे आहेत. यास मंजूरी देऊन वर्क ऑर्डर होऊनही कामे सुरू होणार नसेल तर काही उपयोग नाही. सदरील कामे केव्हा सुरू होणार आहे. |
| मा.सभापती | :कंत्राटदाराने डांबरीकरणाचे कामे घेतलेली आहे. फेंब्रुवारीपर्यंतचे पेमेंट अदा केलेले आहे. पेंमेंटाबत कंत्राटदाराला कुठलाही त्रास झालेला नाही. काम करावे हया अटीवरच पेमेंट करण्यात आले होते. प्रशासनाने संबधीत कंत्राटदाराकडुन काम करून घेण्याची जबाबदारी आहे. काम करीत नसेलतर ब्लॅकलिस्ट करावयास पाहीजे होते. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :शहरात डांबरीकरणाची हीच परिस्थिती आहे. सदरील कंत्राटदार काम करीत नसेल तर कोणती कार्यवाही करणार आहे. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| श्री.महेश माळवतकर | :डांबरीकरणाची कामे आणि नाला सफाईचे कामे पावसाळयापुर्वी होणे आवश्यक आहे. |
| शहर अभियंता | :2 टक्के रक्कम अद्याप पर्यंत कंत्राटदारांनी भरलेली नव्हती. 2 टक्के रक्कम भरून घेण्याची कार्यवाही चालू झालेली आहे. आठ ते दहा दिवसात कामे सुरू होतील. |
| श्री.मधुकर सावंत | :याच कंत्राटदाराने माझ्या वार्डातील 25 लाखाचे काम घेतलेले आहे. वर्क ऑर्डर होऊन एक वर्ष झालेली आहे परंतु काम सुरू झालेले नाही. खुलासा करण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :माझ्या वार्डातील श्री.राजासिंग नावाच्या कंत्राटदार मागील दोन वर्षापासून काम करीत आहे. आता अर्धवट अवस्थेत काम पडलेले आहे. याबाबतची माहीती प्रशासनाला आहे. काय कार्यवाही करणार आहे. |
| श्री.अमित भुईगळ | :ज्या कंत्राटदारांनी 30 ते 35 टक्के जास्त दराने कामे घेतलेली आहे. पावसाळा सुरू होण्याच्या मार्गावर आहे. जेवढे असे ठेकेदार आहेत, त्या सर्वांना ब्लॅक लिस्ट करण्यात यावे. |
| श्री.महेश माळवतकर | :आठ दिवसात सर्व वार्डातील डांबरीकरण पुर्ण झाले पाहीजे. |
| मा.सभापती | :गुत्तेदाराने कामे घेऊन एक वर्ष झाले असुन काम सुरू केलेले नाही. आठ दिवसात काम सुरू केले नाही तर संबधीत गुत्तेदारास ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. 5(2)2 मध्ये मंजूरी देण्यात येईल. दोन दोन वेळेस टेंडर होऊनही कुणी घेतले नाही. याची एकत्रित यादी करून स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावे. |
| श्री.विकास जैन | :किती दिवसांसाठी बाईडिंग असतो. |
| शहर अभियंता | :90 दिवस |
| श्री.विकास जैन | :5 (2) 2 मध्ये मंजूरी देण्यात यावी. |

शहर अभियंता :टेंडर सगळे रिवाईज करावे लागेल.

मा.सभापती :5 (2) 2 मध्ये मंजूरी देण्यासाठी काय करता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :सेकंड लोएस्ट गुत्तेदारास कॉल करण्यात यावे.

शहर अभियंता :30 टक्के above मंजूरी दिलेली आहे. 5(2)2 मध्ये कुणी काम करणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :गुत्तेदारास ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. 5(2)2 मध्ये जी एजन्सी काम करण्यास तयार असेल त्यास काम देण्यात यावे.

मा.सभापती : निवीदा भरतात त्यावेळेस माहीती नव्हते का?

शहर अभियंता : above भरलेले आहे. काम सुरू केले नाहीतर ब्लॅकलिस्ट करणार आहोत.

मा.सभापती :डिएसआर रेट प्रमाणे गुत्तेदारांनी भरले आहे परंतु आता काम करण्यास तयार नाही. गुत्तेदारास ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

श्री.विकास जैन :सन 2008-09चा डिएसआर आहे. आज above देतो म्हणजे आजच्या इस्टीमेटला मॅच होत आहे.

शहर अभियंता :5(2)2 मध्ये मंजूरी देतांना 2008-09चा डिएसआरची मंजूरी देता येणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रशासनाच्या मागे लागुन नगरसेवकांनी अंदाजपत्रक तयार करून घेतले आहे. वर्क ऑर्डर झाल्यानंतर अशा प्रकारची उत्तरे असतील तर ते समाधानकारक नाही योग्य नाही. या सर्व निवीदांना 5(2)2 मध्ये मंजूरी देऊ शकतो. नियमानुसार स्थायी समितीला हा अधिकार आहे. संबधीत गुत्तेदार काम करीत नसेल तर त्याचे डिपॉझिट जप्त करून त्यास ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. गुत्तेदारांनी नागरीकांना नगरसेवकांना वेठीस धरू नये. मनपाच्या लिस्टींगमधील गुत्तेदार काम करीत नसेल तर बाहेरीत गुत्तेदारास काम देऊ शकतो यांची नोंद गुत्तेदारांनी घ्यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :विकासाचा प्रश्न आहे. मा.सभापतींनी आपल्या अधिकाराचा वापर करावा. गुत्तेदार काम न करणे म्हणजे नगरसेवकांचे नुकसान आहे.

श्री.विकास जैन :आठ दिवसाची मुदत.

श्री.अमित भुईगळ :गेल्या सहा वर्षापासून वाट पहात आहे. आठ दिवसांची मुदत कशासाठी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आत्तापर्यंत कित्येक वेळा मुदत देण्यात आली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :येत्या आठ दिवसांत कुठले कामे सुरू झाले कुठले नाही. याबाबतची यादी देण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दुसरे आर्थिक वर्ष संपुन तीसरे आर्थिक वर्ष सुरू होत आहे.

मा.सभापती :संबधीत गुत्तेदारांना चार ते आठ दिवसांचा वेळ देण्यात येत आहे. त्यानंतर काम झाले नसल्यास त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. सर्व प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पुढील स्थायी समितीमध्ये निर्णय घेऊन सभागृहापुढे ठेवण्यात यावे.

श्री.विकास जैन :पुढील बैठकीची तारीख आजच्या सभेत निश्चित करण्यात यावी. म्हणजे त्या तयारीने प्रशासन सभागृहात येतील.

मा.सभापती :19 तारखेच्या सभेसमोर हे सर्व इस्टिमेट आले पाहीजे.

श्री.नासेर खान :चौका चौकामध्ये पेव्हर ब्लॉक 80 ते 85 लाखाचे कामे हे 5 (2) 2 मध्ये झालेली आहे. ते कुणाच्या मंजूरीने झालेली आहे. कुठे झालेली आहे. खुलासा करण्यात यावा. गणपती उत्सव, रमाजान हया काळात झालेली आहे. कुठे कामे झाले आहे. माहीती देण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :कामे केव्हा झाली. सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतली होती का माहीती देण्यात यावी.

मा.सभापती :19 तारखेपर्यंत जे कामे सुरू झालेली नाही. ते स्थायी समितीसमोर घेऊन यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्र.70, विद्यानगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.एम.ए.सिद्दीकी यांची 21% जास्त दरा ऐवजी सदर काम त्यांचेकडून 20% जास्त दराने करून घेणेस व याकामासाठी येणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 229 :**

कार्यकारी अभियंता वार्ड (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर केला की, मोतीवालानगर येथील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,57,600/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

1. मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा 20.99% जास्त दराने.
2. मे.ड्रिमलॅन्ड कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा 21.00%जास्त दराने.

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे निविदांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.99% जास्त असे आहेत. सदरील कामाचे दर हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार असल्याने त्याची तुलना सन 2010-11 च्या दरसुचीनुसार केल्यास सदरील दर 2.9 टक्के कमी असे येतात.

तरी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे अं.प. दरापेक्षा 20.99% जास्त दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मोतीवालानगर येथील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 20.99% जास्त दराचे निविदाधारक मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सदर काम 20% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 230 :**

मा.उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री.भाऊसाहेब तुकाराम किर्तीशाही, ड्रेसर, आरोग्य विभाग यांनी मुलीच्या औषध उपचाराकरीता NEO CLINIC नेईओ क्लिनीक, औरंगाबाद

येथे वैद्यकीय उपचार घेतलेला आहे. संबंधीताने वैद्यकिय उपचाराकरीता झालेल्या खर्चाची देयके रक्कम रूपये 1,29,290/- ची वैद्यकीय देयके वैद्यकीय परतावा मिळणे बाबत सादर केलेली आहे.

करीता संबंधीतांना विशेष बाब म्हणुन उक्त वैद्यकीय परतावा देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.भाऊसाहेब तुकाराम किर्तीशाही, ड्रेसर, आरोग्य विभाग यांनी मुलीच्या औषध उपचाराकरीता NEO CLINIC नेईओ क्लिनीक, औरंगाबाद येथे घेतलेल्या वैद्यकीय उपचाराकरीता झालेल्या रक्कम रूपये 1,29,290/- च्या खर्चास व विशेष बाब म्हणुन उक्त वैद्यकीय परतावा देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळेचे विषय

**विषय क्र. 231 :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील घनकचरा व्यवस्थापन व ड्रेनेज लाईन सफाईचे काम सुरळीतपणे चालण्यासाठी बारावा वित्त आयोग निधी मधुन मशिनरीज खरेदीस मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.207 दिनांक 18/01/2011 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्यानुसार मशिनरीज खरेदीसाठी ई-टेंडरींगद्वारे व वर्तमान पत्रातुन निविदा सूचना प्रसिध्द करून जाहीर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. प्राप्त झालेल्या सर्व निविदांच्या कागदपत्राची तांत्रिक तपासणी करून तांत्रिकदृष्ट्या पात्र असणाऱ्या निविदांचे कमर्शियल बीड उघडण्यात आले असता निविदा धारकांनी पुढीलप्रमाणे दर नोंदविले आहेत.

1. 6000 लिटर टँक क्षमतेची हाय प्रेशर जेटींग मशिन उभारणी करणे (3 नग) : सदरील कामासाठी 3 निविदा प्राप्त झाल्या असून तांत्रिक अटींची पुर्तता एकमेव एजन्सी मे.कॅम अॅव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स, प्रा.लि.पुणे यांनी केलेली असल्यामुळे मे.कॅम अॅव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स, प्रा.लि.पुणे यांची कमर्शियल बीड उघडण्यात आली आहे. या निविदा धारकाने निविदा रकमेच्या 0.3 टक्के कमी दराने निविदा दर नोंदविले आहेत. वाटाघाटीअंती निविदा दराच्या 1 टक्के कमी दराने काम करण्याची तयारी मे.कॅम अॅव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स, प्रा.लि.पुणे यांनी दर्शविली आहे.
2. अॅपेरिक्षा चेसीसवर एक घनमिटर क्षमतेच्या हायड्रोलिक हॉपरची उभारणी करणे (15 नग) : सदरील कामासाठी 2 निविदा प्राप्त झाल्या असुन तांत्रिक अटींची पुर्तता मे.चिंतामणी मोटर्स, सांगली या एकमेव निविदा धारकाने केलेली असल्यामुळे या एजन्सीचे कमर्शियल बीड उघडण्यात आले आहे. या निविदा धारकाने निविदा रकमेच्या 1 टक्के कमी दर नोंदविलेली असुन वाटाघाटीअंती निविदा रकमेच्या 3 टक्के कमी दराने काम करण्याची तयारी मे.चिंतामणी मोटर्स, सांगली यांनी दर्शविली आहे.
3. 6 नग स्कीप लोडर युनिटसची उभारणी करणे व 4.5 घनमिटर क्षमतेचे 60 नग स्कीप लोडर बिन्सचा पुरवठा करणे : सदरील कामासाठी एकुण 4 निविदा प्राप्त झाल्या असुन पैकी मे.न्यु साई फायबर्स,मिरज व मे.कॅम अॅव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स, प्रा.लि.पुणे या दोन निविदा धारकांनी निविदेच्या तांत्रिक अटींची पुर्तता केलेली असल्यामुळे त्यांचे कमर्शियल बीड उघडण्यात आले आहे. मे.न्यु साई फायबर्स,मिरज यांनी नोंदविलेले निविदा रकमेच्या 0.25 टक्के कमी हे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. वाटाघाटीअंती मे.न्यु साई फायबर्स, मिरज यांनी निविदा रकमेच्या 1 टक्के कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

4. जेटींग मशिन्स उभारणीसाठी 3 नग TATA-LPT 1109/42 EX PS BSIII चेसीसची आवश्यकता असुन स्कीप लोडर युनीटस उभारणीसाठी 6 नग TATA-LPT 909/38 BSIII चेसीसची आवश्यकता आहे. या चेसीस शासकीय दराने टाटा कंपनीचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे.सतिष मोटर्स प्रा.लि. यांचेकडून खरेदी करण्यात येतील. TATA-LPT 1109/42 EX PS BSIII चेसीससाठी प्रति नग रूपये 9,56,730/- + CRTM Charges रूपये 1,500/- प्रमाणे 3 चेसीससाठी एकुण रूपये 28,74,690/- खर्च येणार असुन TATA-LPT 909/38 BSIII चेसीससाठी प्रति नग रूपये 8,36,670/- + CRTM Charges रूपये 1,500/- प्रमाणे 6 चेसीससाठी एकुण रूपये 50,29,020/- खर्च येणार आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | तुलनात्मकदृष्ट्या कमी दर नोंदविलेल्या एजन्सीचे नांव | अंदाजपत्रकीय दर | वाटाघाटीअंती निश्चित केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1. | 6000 लिटर टँक क्षमतेची हाय प्रेशर जेटींग मशीन उभारणी करणे (3नग) | मे.कॅम अॅव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स, प्रा.लि.पुणे | रू.52,78,332/- | 1 टक्के कमी |
| 2. | अॅपेरिक्षा चेसीसवर एक घनमिटर क्षमतेच्या हायड्रोलिक हॉपरची उभारणी करणे (15 नग) | मे.चिंतामणी मोटर्स, सांगली | रू.22,50,000/- | 3 टक्के कमी |
| 3. | 6 नग स्कीप लोडर युनिटसची उभारणी करणे व 4.5 घनमिटर क्षमतेचे 60 नग स्कीप लोडर बीन्सचा पुरवठा करणे | मे.न्यु साई फायबर्स,मिरज | रू.71,70,000/- | 1 टक्के कमी |

उपरोक्त प्रमाणे जाहीर निविदेद्वारे प्राप्त झालेल्या दरात वाटाघाटीअंती निश्चित केलेले दर व एजन्सीस मान्यतेस्तव प्रस्ताव सादर. तसेच शासकीय दराने टाटा कंपनीच्या चेसीस स्थानिक अधिकृत विक्रेत्याकडुन खरेदी करण्यास प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : ऐनवेळेचे सर्व विषय मंजूर करण्यात येतात.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील घनकचरा व्यवस्थापन व ड्रेनेज लाईन सफाईचे काम सुरळीतपणे चालण्यासाठी बारावा वित्त आयोग निधी मधुन मशिनरीज खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या खालील तक्त्यात दर्शविलेल्या निविदा दरानुसार खरेदी करणेस मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र | कामाचे नांव | तुलनात्मकदृष्ट्या कमी दर नोंदविलेल्या एजन्सीचे नांव | अंदाजपत्रकीय दर | वाटाघाटीअंती निश्चित केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1. | 6000 लिटर टँक क्षमतेची हाय प्रेशर जेटींग मशीन उभारणी करणे (3नग) | मे.कॅम अॅव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स, प्रा.लि.पुणे | रू.52,78,332/- | 1 टक्के कमी |
| 2. | अॅपेरिक्षा चेसीसवर एक घनमिटर क्षमतेच्या हायड्रोलिक हॉपरची उभारणी करणे (15 नग) | मे.चिंतामणी मोटर्स, सांगली | रू.22,50,000/- | 3 टक्के कमी |
| 3. | 6 नग स्कीप लोडर युनिटसची उभारणी करणे व 4.5 घनमिटर क्षमतेचे 60 नग स्कीप लोडर बीन्सचा पुरवठा करणे | मे.न्यु साई फायबर्स,मिरज | रू.71,70,000/- | 1 टक्के कमी |

तसेच अ.क्र.4 साठी जेटींग मशिन्स उभारणीसाठी 3 नग TATA-LPT 1109/42 EX PS BSIII चेसीस व स्कीप लोडर युनीटस उभारणीसाठी 6 नग TATA-LPT 909/38 BSIII चेसीस शासकीय दराने टाटा कंपनीचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे.सतिष मोटर्स प्रा.लि. यांचेकडून TATA-LPT 1109/42 EX PS BSIII चेसीससाठी प्रति नग रूपये 9,56,730/- + CRTM Charges रूपये 1,500/- प्रमाणे 3 चेसीससाठी एकुण रूपये 28,74,690/- आणि TATA-LPT 909/38 BSIII चेसीससाठी प्रति नग रूपये 8,36,670/- + CRTM Charges रूपये 1,500/- प्रमाणे 6 चेसीससाठी एकुण रूपये 50,29,020/- लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 232 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.42 रोशनगेट वार्डामध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरीता 100, 150 व 250 मी.मी. व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाच्या सन 2009-10 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 9,85,167/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविली असता एकमेव निविदा प्राप्त झाली आहे. ती खालीलप्रमाणे.

1. श्री.सुरेश बी. साधवानी - 32.00% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदा ही श्री.सुरेश बी. साधवानी यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.00% जास्त दराने असल्यामुळे कंपनीचे बाजारभावाची दरपत्रके मागवुन दर पृथकरण तयार करण्यात आले असता (1) जिंदाल या कंपनीचे दर 29.21% जास्त आणि (2) इलेक्ट्रोथर्म कंपनीचे दर 31.34% जास्त दर येतात. त्यानुसार गुत्तेदार यांना बोलावुन 29% जास्त दराने काम करण्यास विचारणा केली असता गुत्तेदार यांनी 29% जास्त दराने काम करण्यास होकार दिलेला आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

तरी श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29% जास्त दराची निविदा स्विकृतीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.42 रोशनगेट वार्डामध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरीता 100, 150 व 250 मी.मी. व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकावयाचे कामाकरीता प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी. साधवानी यांची 29% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 233 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.20 आंबेडकरनगर येथे 100 मी.मी. ए.सी. जलवाहीनी बंद करून 150 मी.मी. व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाच्या सन 2009-10 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 9,58,400/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविली असता एकमेव निविदा प्राप्त झाली आहे. ती खालीलप्रमाणे.

1. श्री.सुरेश बी. साधवानी - 32.00% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदा ही श्री.सुरेश बी. साधवानी यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.00% जास्त दराने असल्यामुळे कंपनीचे बाजारभावाची दरपत्रके मागवुन दर पृथकरण तयार करण्यात आले असता (1) जिंदाल या कंपनीचे दर 29.23% जास्त आणि (2) इलेक्ट्रोथर्म कंपनीचे दर 31.37% जास्त दर येतात. त्यानुसार गुत्तेदार यांना बोलावुन 29% जास्त दराने काम करण्यास विचारणा केली असता गुत्तेदार यांनी 29% जास्त दराने काम करण्यास होकार दिलेला आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

तरी श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29% जास्त दराची निविदा स्विकृतीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.20 आंबेडकरनगर येथे 100 मी.मी. ए.सी. जलवाहीनी बंद करून 150 मी.मी. व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकावयाचे कामाकरीता प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी. साधवानी यांची 29% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 234 :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.89 येथील दशमेशनगर भागातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.19,93,199/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता झालेली आहे. सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण पाच कोरी निविदा पत्रके विकल्या गेली आणि स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदाचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.ए.एस.कंस्ट्रक्शन | 26.26% जास्त दराने |
| 02. | एम.ए.सिद्दीकी | 42.00% जास्त दराने. |
| 03. | मे.आदीनाथ कंस्ट्रक्शन | 45.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.26% जास्त दराचे मे.ए.एस.कंस्ट्रक्शन यांचे निविदापत्रक आहे. सदरील दर हे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार आहेत. प्राप्त दराची तुलना सन 2010-11 च्या दरसुचीनुसार केली असता सदरील दर 2.82% जास्त असे येतात. तरी मे.ए.एस.कंस्ट्रक्शन यांचेकडुन सदरील काम 26.26% जास्त या दराऐवजी 21.00% जास्त या दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्र.89 येथील दशमेशनगर भागातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ए.एस.कंस्ट्रक्शन यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.00% जास्त दराऐवजी 20% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 235 :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) यांनी प्रस्ताव दिला आहे की, वार्ड क्र.92 अंतर्गत मुख्य रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.14,72,000/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता झालेली आहे. सदर कामाकरीता निविदापत्रके

मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण दोन कोरी निविदा पत्रके विकल्या गेली आणि स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त एकच निविदापत्रके दर भरून प्राप्त झाले. प्राप्त निविदाचे दर खालीलप्रमाणे आहेत.

01. एम.ए.सिद्दीकी 38.00% जास्त दराने

श्री.एम.ए.सिद्दीकी यांनी दिलेले वरील दर हे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार असल्याने त्याची तुलना सन 2010-11 च्या दरसुचीनुसार केली असता सदरील दर 21.46% जास्त येतात. तरी श्री.एम.ए.सिद्दीकी यांनी दिलेले अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38.00% जास्त दराऐवजी सदरील काम त्यांचेकडुन 21.46% जास्त दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्र.92 अंतर्गत मुख्य रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.एम.ए.सिद्दीकी यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.46% जास्त दराऐवजी 20% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 236 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड इ व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्र.क्र.79, मुकूंदवाडी (स्लम) अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 9,98,512/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च नविन डांबरी रस्ते स्लम या लेखा शिर्षकामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

1. श्री.एम.ए.सिद्दीकी - 38.00% जास्त दराने
2. मे.आदिनाथ कंस्ट्रक्शन - 45.1% जास्त दराने

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38.00% जास्त दराची श्री.एम.ए.सिद्दीकी यांची निविदा प्राप्त झाली होती. वाटाघाटीअंती संबंधीत गुत्तेदाराने सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25.88% जास्त दराने करण्यास समंती दिली असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 9,98,512/- पेक्षा 25.88% जास्त दराने म्हणजेच रक्कम रूपये 2,58,415/- एवढा वाढीव खर्च अपेक्षित आहे.

करीता श्री.एम.ए.सिद्दीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25.88% जास्त दराची निविदा एकुण रक्कम रूपये 12,56,927/- च्या खर्चासह मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्र.क्र.79, मुकूंदवाडी (स्लम) अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.एम.ए.सिद्दीकी यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25.88% जास्त दराऐवजी 20% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 237 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, औरंगाबाद महानगरपालिका संचलित टाऊन हॉल येथे कलादालनाची दैनंदिन देखभाल व कामे पार पाडण्यासाठी मानद क्युरेटर (काळजीवाहक) म्हणुन श्री.हंसराज बन्सवाल यांना द.म. रू.5000/- मानधनावर नियुक्त केले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने दि.04/12/2007 रोजी गुणवत्तेनुसार उत्कृष्ठ ठरलेल्या श्री.हंसराज बन्सवाल यांची मानद क्युरेटर म्हणुन निवड केली आहे. यापूर्वी आयुक्तांनी त्यांना दि.3/12/2010 पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

त्यांचे काम समाधानकारक असल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (1) नुसार पुढील दोन दिवसाचा खंड देऊन पुढील 11 महिन्याची मुदतवाढ दि.07/12/2010 ते 08/10/2011 चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका संचलित टाऊन हॉल येथे कलादालनाची दैनंदिन देखभाल व कामे पार पाडण्यासाठी मानद क्युरेटर (काळजीवाहक) श्री.हंसराज बन्सवाल यांना द.म. रू.5000/- मानधनावर त्यांचे काम समाधानकारक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (1) नुसार त्यांना पुढील दोन दिवसाचा खंड देऊन पुढील 11 महिन्यासाठी (दि.07/12/2010 ते 08/10/2011पर्यंत) मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 238 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर ए आणि बी मध्ये डांबरी रस्त्यालगत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार या अंदाजपत्रक र.रू.13,99,600/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (3) तीन प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा पी.एस.टेंभुर्णीकर यांची असुन, ती अंदाजपत्रक दरापेक्षा 19.2% कमी दराची आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होवुन मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तथापी श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रक दरापेक्षा 19.2% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर ए आणि बी मध्ये डांबरी रस्त्यालगत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.2% कमी दराची श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 239 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर ई आणि फ मध्ये डांबरी रस्त्यालगत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार या अंदाजपत्रक र.रू.13,99,400/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (3) तीन प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा पी.एस.टेंभुर्णीकर यांची असुन, ती अंदाजपत्रक दरापेक्षा 18.9% कमी दराची आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता

होवुन मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तथापी श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रक दरापेक्षा 18.9% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर ई आणि फ मध्ये डांबरी रस्त्यालगत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.9% कमी दराची श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 240 :**

कार्यकारी अभियंता वार्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर सी आणि डी मध्ये डांबरी रस्त्यालगत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार या अंदाजपत्रक र.रू.13,99,200/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (3) तीन प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा पी.एस.टेंभुर्णीकर यांची असुन, ती अंदाजपत्रक दरापेक्षा 19.2% कमी दराची आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होवुन मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तथापी श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रक दरापेक्षा 19.2% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 येथे सेक्टर सी आणि डी मध्ये डांबरी रस्त्यालगत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.2% कमी दराची श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 241 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागातील रस्त्यांचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यासाठीच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.19.74 /- कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 3 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत 3 निविदा प्राप्त झाल्या परंतु दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या रद्द करण्यात आल्या व त्यामधील एक निविदा प्राप्त झाली हि निविदा दि.08/04/2011 रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मे.जी.एन.आय.इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. अंदाजपत्रकीय दरापेक्षा 51.13% जास्त दराने

प्राप्त निविदा दर जास्त असल्याने संबंधीत गुत्तेदाराकडुन दर कमी करण्याबाबत विचारणा केली असता संबंधीत गुत्तेदार यांनी 50.13% जास्तीचे दर सादर केले आहे.

उपरोक्त सर्व बाबीचा विचार करून गुत्तेदार यांना मा.आयुक्त यांच्या दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीअंती 39.95% जास्त दराने निविदा मंजुर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. Differed Payment धर्तीवर सदरचे काम हे निविदा प्रमाणे 24 महिन्यांत पुर्ण करावयाचे असुन सदर कामावरील खर्चाचे देयक हे खालीलप्रमाणे आहेत. व चालु देयक अदा करतांना उर्वरित 30% व 40% रक्कमेचे P.D.C. देण्यांत यावे.

1. पहिले वर्ष - गुत्तेदाराचे देयक मंजुर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकुण रक्कमेचे 30% हद्दीपर्यंत.
2. दुसरे वर्ष - गुत्तेदाराचे देयक मंजुर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकुण रक्कमेचे 30% हद्दीपर्यंत.
3. तिसरे वर्ष - गुत्तेदाराचे देयक मंजुर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकुण रक्कमेचे 40% हद्दीपर्यंत.

सदर कामासाठी डिफेक्ट लायबिलीटी कालावधी हा 3 वर्षाचा आहे.

तरी प्रकरणी सदर कामाची निविदा 39.95% जास्त दराने मान्य करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागातील रस्त्यांचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.जी.एन.आय.इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची 39.95% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 242 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विकास योजना रस्त्यांचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यासाठीच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2010-11 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29.79/- कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 3 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 1 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. प्राप्त झालेल्या निविदा हि दि.08/04/2011 रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मे.जी.एन.आय.इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. अंदाजपत्रकीय दरापेक्षा 55.13% जास्त दराने

प्राप्त निविदा दर जास्त असल्याने संबंधीत गुत्तेदाराकडुन दर कमी करण्याबाबत विचारणा केली असता संबंधीत गुत्तेदार यांनी 54.13% जास्तीचे दर सादर केले आहे.

उपरोक्त सर्व बाबीचा विचार करून गुत्तेदार यांना मा.आयुक्त यांच्या दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीअंती 39.95% जास्त दराने निविदा मंजुर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. Differed Payment धर्तीवर सदरचे काम हे निविदा प्रमाणे 24 महिन्यात पुर्ण करावयाचे असुन सदर कामावरील खर्चाचे देयक हे खालीलप्रमाणे आहेत. व चालु देयक अदा करतांना उर्वरित 30% व 40% रक्कमेचे P.D.C. देण्यात यावे.

1. पहिले वर्ष - गुत्तेदाराचे देयक मंजुर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकुण रक्कमेचे 30% हद्दीपर्यंत.
2. दुसरे वर्ष - गुत्तेदाराचे देयक मंजुर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकुण रक्कमेचे 30% हद्दीपर्यंत.
3. तिसरे वर्ष - गुत्तेदाराचे देयक मंजुर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकुण रक्कमेचे 40% हद्दीपर्यंत.

सदर कामासाठी डिफेक्ट लायबिलीटी कालावधी हा 3 वर्षाचा आहे.

तरी प्रकरणी सदर कामाची निविदा 39.95% जास्त दराने मान्य करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील विकास योजना रस्त्यांचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.जी.एन.आय.इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची 39.95% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 243 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.25 सिडको एन-7 येथे कम्युनिटी सेंटर ते सेक्टर सी-2 मध्ये रस्त्याचे रूंदीकरण करून डांबरीकरण करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.9,99,950/- चे अंदाजपत्रकास मान्यता होवुन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (4) चार निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदापैकी सर्वात जास्त दराची निविदा श्रीजीत एस काऊपुरंबील यांची असून ती अ.प.दरापेक्षा 19.86% जास्त दराची आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची अ.प. दरापेक्षा 19.86% जास्त दराने मान्यता होवून मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे. तथापी श्रीजीत एस काऊपुरंबील यांची उपरोक्त कामाची अ.प. दरापेक्षा 19.86% जास्त दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.25 सिडको एन-7 येथे कम्युनिटी सेंटर ते सेक्टर सी-2 मध्ये रस्त्याचे रूंदीकरण करून डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.86% जास्त दराची श्रीजीत एस काऊपुरंबील यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 244 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.49 गुलमोहर कॉलनी एन-5 येथील जीजामाता शाळेपासून एन-5 कम्युनिटी सेंटर समोरून अविष्कार चौकापर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.19,97,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षामधुन करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होवुन मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.19,97,000/- चे अ.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.49 गुलमोहर कॉलनी एन-5 येथील जीजामाता शाळेपासून एन-5 कम्युनिटी सेंटर समोरून अविष्कार चौकापर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.19,97,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 245 :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो.विष्णुनगर येथील उर्वरीत भागात नाला संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.22,77,900/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची विषय क्र.896 दिनांक 25/01/2010 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. परंतु सदर कामाकरीता सुधारीत अंदाजपत्रक र.रू.24.00 लक्षचे तयार करण्यात आले आहे. तसेच सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता फक्त एकच निविदापत्रक दर भरून प्राप्त झाले आहे. प्राप्त निविदाचे दर खालीलप्रमाणे आहेत.

01. मे.एल.के.कंस्ट्रक्शन 17.11% कमी दराने

तरी वरीलप्रमाणे प्राप्त मे.एल.के.कंस्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.11% कमी दराचे निविदापत्रक तसेच सदर कामाकरीता तयार करण्यात आलेले र.रू.24.00 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.विष्णुनगर येथील उर्वरीत भागात नाला संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.एल.के.कंस्ट्रक्शन यांची 17.11% कमी दराची निविदा स्विकारणेस र.रू.24.00 लक्षच्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

| | |
|---|---|
| श्री.विजय वाघचौरे | :पावसाळ्यास दोन महिने बाकी असतांना नाले सफाई कधी होणार खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :नाले सफाई ऐणपावसाळयात काम सुरू होते नाले सफाई आत्तापासून करण्यात यावे. |
| शहर अभियंता | :कामे सुरू झाली पाहीजे. कार्यकारी अभियंता यांनी काम पुर्ण केले पाहीजे. उपअभियंता यांनी काम केले पाहीजे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :माझ्या वार्डामध्ये मागच्या पावसाळयामध्ये पाणी शिरले होते. लगतच्या नाल्याच्या भिंती तुटल्या. भिंती बांधण्यासाठी निवीदा प्रक्रीया पुर्ण केली. परंतु अजुनही कामे सुरू होत नाही. प्रशासनाचे हे उत्तर संयुक्तीक नाही. |
| श्री.अमित भुईगळ | :लोटाकारंजा येथील नाला मागील एक वर्षापासुन तुटलेला आहे. नागरीकांना जाण्या-येण्यासाठी रस्ता नाही. अद्यापर्यंत पुलाचे काम झालेले नाही. पालकमंत्र्यांनी त्या ठिकाणी भेट दिली होती. |
| श्री.विजय वाघचौरे | :नाले सफाई होणे आवश्यक आहे. नाले पुर्ण भरलेले आहे. नाले सफाईचे टेंडर कशा पध्दतीने दिले होते. काम पावसाळयापुरते मर्यादित होते काय? |
| श्री.नासेर खान | :विजय नगर येथे मागील पावसाळयात आठ फुट पाणी भरले होते. टेंडर होऊनही काम होत नाही. 11 लाखाचे काम आहे. शहर अभियंता यांनी पहाणी केलेली आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :अशीच परिस्थिती माझ्या वार्डात आहे. झांबड इस्टेटमध्ये एक फ्लोअर पाण्यात बुडालेले होते. एक कुटूंब वाहुन गेले. एका व्यक्तीचा यात मृत्यु झाला. तरीही नाला संरक्षण भिंतीचे काम सुरू होत नाही. प्रशासनास संचिका सापडत नाही. |
| शहर अभियंता | :कार्यवाही करावी लागेल. |
| श्री.विकास जैन | :ब्लॅकलिस्ट करून 5(2)2 मध्ये मंजूरीसाठी सभागृहापुढे आणावे. |
| श्री.नासेर खान | :पाण्याची समस्या वार्डात गंभिर झालेली आहे. वार्डात लाईट सुरू नसतात. काल संसार नगर येथील नागरीकांनी दगडफेक केली. वार्डातील संपुर्ण लाईट बंद अवस्थेत होती. प्रशासनास अनेक वेळा फोनद्वारे संपर्क केला. परंतु लाईट सुरू करण्यात आले नाही. यापुर्वीच्या बैठकीत सांगण्यात आले होते की, 70 ते 75 लाईट बंद अवस्थेत आहे. वार्डात पाणीही येत नाही. सभागृहातील सर्व सदस्यांची हीच समस्या आहे. गेल्या आठ दिवसात पाण्याची समस्या उद्भवली आहे. बैठक संपन्न झाल्यावर प्रशासन त्यास |

गांभीर्याने घेत नाही. तीन समस्या आहे. 1) काल लाईट का बंद होती. 2) एक महिण्यापासून लाईट का बंद आहे. 3) वार्डात पाणी का येत नाही. महानगरपालिकेचे कामाचे वर्ष कुठून कुठपर्यंत सुरू होते आणि संपते. याबाबतची माहीती देण्यात यावी.

मा.सभापती :किती लाईट सुरू आहे किती बंद आहे सविस्तर खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता(विद्युत) :काल संपुर्ण वार्डात मेन रोडवरील लाईटची पहाणी केलेली आहे. सर्व लाईट सुरू आहे.

मा.सभापती :मी स्वतः वार्डात अधिकाऱ्यांसोबत होतो. त्यांनी पहाणी केलेली आहे. मेन रोडची लाईट बंद आहे की, आतील बंद आहे.

श्री.नासेर खान :सर्व लाईट बंद आहे.

मा.सभापती :क्रांतीचौक ते सिटीचौक येथील सर्व लाईट सुरू करण्यात आली आहे.

श्री.नासेर खान :सिल्लेखाना ते सावरकर चौक येथील पुर्ण लाईट बंद आहे. नुतन कॉलनी ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथील लाईट बंद आहे.

उपअभियंता(विद्युत) :फक्त सहा लाईट बंद आहे. क्रंाती चौक, नुतन कॉलनी येथील लाईट सुरू आहे. सिल्लेखाना येथील लाईट सुरू केले आहे.

श्री.नासेर खान :सभागृहास खोटी माहीती देउ नये. मी माझ्या पदाचा राजीनामा देईल. प्रशासनाची मनमानी चालू आहे. चुकीचे बोलत असेल तर मला निलंबीत करण्यात यावे. माझ्या वार्डातील कामे झाले पाहीजे. माझ्या वार्डातील पाणी सप्लायचे काम का होत नाही.

मा.सभापती :नगरसेवकांना नागरीकांचा सन्मान करावा लागतो. प्रशासन या गोष्टीला सहजतेने घेत असेल तर संबधीतावर कार्यवाही करावी लागेल. श्री.शाकेर, यांना सभागृहात बोलविण्यात यावे. व किती लाईट सुरू आहे बंद आहे. याबाबतची माहीती देण्यात यावी.

श्री.विजय वाघचौरे :एक लाईनमन वार्डात लाईटाची स्थिती बघण्याकरीता येत नाही.

मा.सभापती :वॉटर सप्लायचा खुलासा करण्यात यावा.

श्री.नासेर खान :वॉटर सप्लायचे काम आठ दिवसांत होईल म्हणुन सांगण्यात आले होते. फक्त कंत्राटदाराची या ठिकाणी चलती आहे. पैसे देणाऱ्याचे काम होतात. हा माझा स्पष्ट आरोप आहे.

मा.प्र.आयुक्त :स.सदस्यांनी पाण्याच्या बाबतीत जी तक्रार मांडलेली आहे. त्यानुषंगाने श्री.फारूकी यांना बैठक संपल्यानंतर तातडीने बोलावुन घेऊन कार्यवाही करण्याची ग्वाही मी स्वतः देतो. भविष्यात अशा तक्रारी येणार नाही याची काळजी घेतली जाईल. प्रशासनास पाणी पुरवठयासाठी तातडीने योग्य ती कार्यवाही करून/उपाययोजना करण्यासंबधीच्या सूचना सकाळीच देण्यात आलेल्या आहेत. शहर अभियंता यांचेवरही जबाबदारी सोपविलेली आहे.

मा.सभापती :पाणी पुरवठयाची जबाबदारी शहर अभियंता यांचेकडे देण्यात येऊ नये.

श्री.नासेर खान :पाच पैकी दोनच पंपीग चालू आहे.

मा.सभापती :जायकवाडीहुन 147 एमएलडी पाणी देण्यात येते.

श्री.नासेर खान :सभापती यांचे दालनात मा.सभापती सोबतच्या बैठकीमध्ये शहर अभियंता, श्री.फारूखी यांनी काम करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर सदरील

| | |
|---|---|
| | ठिकाणची मोजणी केली व रूपये 10 लाखाचा खर्च येईल म्हणून सांगण्यात आले. आठ दिवसापुर्वी पाणी पुरवठा व्यवस्थित होत होता. |
| श्री.मधुकर सावंत | :एक वर्ष झाले स्थायी समिती होऊन आठ सदस्य चिठ्ठ्या टाकुन निवृत्त होणार आहे. नगरसेवक कामासाठी तळमळीने प्रश्न मांडत आहे. परंतु काम मार्गी लागत नाही. |
| मा.सभापती | :बरेच कामे मार्गी लागलेले आहे. |
| श्री.मधुकर सावंत | :एकही काम सुरू झालेले नाही. |
| मा.सभापती | :स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. प्रशासनाकडुन काम करून घेतले पाहीजे. |
| श्री.मधुकर सावंत | :वर्क ऑर्डर झालेले आहे. काम सुरू झालेले नाही. |
| मा.सभापती | :ऐनवेळचे सर्व विषय मंजूर. |

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद